|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.

## निवेदन

## ३० वा दीक्षांत समारंभ

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातर्फे ऑक्टोबर/नोव्हेंबर-२०२० व एप्रिल/मे-२०२१ मध्ये आणि त्यापुर्वी घेण्यात आलेल्या परीक्षांमध्ये जे विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत अशा सर्व विद्यार्थ्यांकडून आणि ज्यांना Ph.D. घोषीत झालेली आहे अश्या Ph.D. धारक विद्यार्थ्यांकडून पदवी/पदविका प्रमाणपत्रासाठी Online अर्ज मागविण्यात येत आहेत. त्याअनुषंगाने विद्यार्थ्यांना पदवी/पदविका प्रदान करण्यासाठी **"तिसावा दीक्षांत समारंभ"** आयोजीत करण्यात येणार आहे.

३० वा दीक्षांत समारंभात ज्या विद्यार्थ्यांना पदवी/पदविका प्रमाणपत्रे घ्यावयाची आहे, अशा विद्यार्थ्यांना पदवी/पदविका प्रमाणपत्रे मिळण्यासाठी भरावयाचे Online अर्ज विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेत स्थळावर (वेबसाईटवर) Home Page वरील Student Conrner→ Examination →Convocation वर खालील मुदतीत उपलब्ध आहेत. तरी विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या संकेत स्थळावर Online पदवीप्रमाणपत्र अर्ज भरावा. अर्ज भरण्यासाठी अधिकची माहिती विद्यापीठाच्या वरील संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

### -:ऑक्टोबर/नोव्हेंबर- २०२० व एप्रिल/मे-२०२१ तसेच त्यापूर्वीच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांकरीता आणि Ph.D. धारक विद्यार्थ्यांकरीता पदवी/पदविका प्रमाणपत्र अर्ज करावयाचा विहित कालावधी :-

| | |
|---|---|
| विनाविलंब शूल्कासह Online अर्ज भरण्याची मुदत | दि. ११ ऑक्टोबर, २०२१ ते ३० नोव्हेंबर, २०२१ |
| विलंब शूल्कासह Online अर्ज भरण्याची मुदत | दि. ०१ डिसेंबर, २०२१ ते ३१ डिसेंबर, २०२१ |

| | पदवी/पदविका अर्जासोबत भरावयाचे शूल्क खालीलप्रमाणे | |
|---|---|---|
| १ | पदवीप्रमाणपत्र शूल्क (उत्तीर्ण वर्षापासून पाचवर्षाचे आत) | ₹ ३५०/- |
| २ | पदवीप्रमाणपत्र शूल्क (उत्तीर्ण वर्षापासून पाचवर्षापेक्षा जास्तीचा कालावधी) | ₹ १०००/- |

पदवीप्रमाणपत्राचे शूल्क Credit Card/Debit Card/Net Banking व्दारे Online Payment करावे. Online अर्ज भरतांना दिलेल्या सूचनांचे पालन करावे. अर्जात अपुर्णता/त्रृटी असल्यास अर्ज शूल्कासह रद्द करण्यात येईल.

दीक्षांत समारंभाबाबतची सर्व माहिती यथावकाश वर्तमानपत्रात तसेच विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेत स्थळावर जाहीर केली जाईल. तरी मा. प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये व मा. संचालक, मान्यताप्राप्त संस्था यांना विनंती की, त्यांनी सोबतची माहिती सर्व संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देवून विद्यापीठास सहकार्य करावे.

प्र.संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जा.क्र. कबचौउमवि/पदवी/७ह/२५०२ /२०२१ दि.०८/१०/२०२१

प्रति माहिती व कार्यवाहीसाठी :

१) मा. प्राचार्य/म. संचालक, सर्व महाविद्यालये/संस्था यांना विनंती की, हे निवेदन सूचना फलकावर लावण्याची व्यवस्था करावी.

२) कबचौउमवि अंतर्गत सर्व विभाग प्रमुख (प्रशासकीय विभाग व शैक्षणीक प्रशाळा)

३) मा. संपादक दै. यांना जळगाव, धुळे व नंदूरबार जिल्ह्यातून प्रसिध्दीसाठी.

४) मा. संपादक दै. यांना मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक, अहमदनगर प्रसिध्दीसाठी.